**आतील पानात वाचा**

- भ्रष्ट दानपेटी चोरट्यांना, देवाचा धाक वाटेनासा झालाय..?
- दैनिक अक्षराज चे पत्रकार वसंत रांधवण यांना सत्यशोधक पत्रकारिता पुरस्कार जाहीर
- पंढरपूरच्या प्रशासकीय बळकटीला मोठी चालना...

दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा... आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा — Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : ३५७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०७ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056





# आम्ही देऊ तो निर्णय भविष्यासाठी लागू होईल : सुप्रीम कोर्ट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नवी दिल्ली :** शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणावर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बाजूने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला. कपिल सिब्बल यांनी पुन्हा एकदा विधीमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष वेगवेगळे असल्याचा मुद्दा मांडला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या २०२२ च्या बंडानंतर १० व्या सूचीनुसार आमदारांना अपात्र करणं गरजेचं होतं, असा युक्तिलाद कपिल सिब्बल यांनी केला. यावेळी करण्यात आलेल्या युक्तिवादानंतर कोर्टाने आम्हाला अपात्रता ठरवायची आहे. तसेच आम्ही देऊ तो निर्णय भविष्यासाठी लागू होईल, अशी टीप्पणी सप्रीम कोर्टाने केली.

**कपिल सिब्बल यांनी नेमका काय युक्तिवाद केला?**

बाळासाहेब ठाकरे यांनी पक्षाची नियुक्ती केली असली तरी १९८९ साली आमचा पक्ष राजकीय पक्ष म्हणून नोंद झाला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या निधननंतर पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली होती. यावेळी पक्षाच्या घटनेत सुधारणा करण्यात आली होती. संघटना स्तरावर उद्धव ठाकरेंकडे बहुमत होतं. आम च्याकडून निवडणूक आयोगात सगळ्या गोष्टी मांडण्यात आल्या आहेत, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.




**• कोर्टाची महत्त्वाची टिप्पणी !**

निवडणूक आयोगाने विधीमंडळातील बहुमत पाहून निर्णय दिला, असं कपिल सिब्बल म्हणाले. यावेळी कपिल सिब्बल यांनी सुभाष देसाई यांच्या केसचा उल्लेख करण्यात आला. कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादानंतर कोर्टाने टिप्पणी केली. आम्हाला आमदार अपात्रता ठरवायची आहे. आम्ही निर्णय देऊ तो भविष्यासाठी लागू होईल, असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं आहे.

२०१८ मध्ये निवडणूक आयोगाकडे सगळ्या गोष्टी मांडण्यात आल्या. पक्षाच्या २०१८ च्या संविधानानुसार १० पैकी ६ नेत्यांनी उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता. त्यापैकी एका नेत्याचं निधन झालं आहे. नेते, उपनेते, जिल्हा प्रमुख, संपर्कप्रमुख या सर्वांनी उद्धव ठाकरेंना सपोर्ट दिला होता. त्याची कागदपत्रे आम्ही निवडणूक आयोगात सादर केली होती, असा युक्तिवाद सिब्बल यांनी कोर्टात केला.

**'शिंदेंना पक्षाच्या घटनेत बदल करण्याचा अधिकार नाही'**

विधीमंडळ स्तरावर शिंदेंकडे बहुमत होतं. पण शिंदे पक्षाच्या घटनेत बदल करु शकत नाहीत. त्यांना तसे अधिकार नव्हते, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. विधीमंडळ पक्षात पडलेली फूट ही राजकीय पक्षाची फूट मानायची का? असा सवाल कपिल सिब्बल यांनी युक्तिवादावेळी केला.

**कपिल सिब्बल यांच्याकडून विविध केसचा दाखला**

कपिल सिब्बल यांच्याकडून इंदिरा गांधी विरुद्ध ब्रह्मानंद रेड्डी केसचा दाखला देण्यात आला. तसेच सम ाजवादी पक्षाच पडलेल्या फुटीचा देखील दाखला कपिल सिब्बल यांच्याकडून देण्यात आला.

**कपिल सिब्बल यांचे निवडणूक आयोगावर ताशेरे**

कार्यक्षेत्राच नसलेले निर्णय निवडणूक आयोगाने घेतले. आम चा पक्ष, आणि चिन्हं घेतलं आणि सरकारही बनवलं. पक्ष कुणाचा हे निवडणूक आयोगाने ठरवलं. त्यांना चिन्ह दिलं. आमदार अपात्रतेचा निर्णय तेव्हा घेणं गरजेचं होतं. आम्ही २३ तारखेला अपात्रतेची याचिका दाखल केलेली. १७ फेब्रुवारीला निवडणूक आयोगाने शिंदे गटाला चिन्ह दिलं, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

**न्यायाधीशांची आपापसात चर्चा!**

कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादादरम्यान न्यायाधीशांनी आपापसांत काही मिनिटे चर्चा केली. यानंतर विधानसभा अध्यक्षांनी आमदार अपात्रतेचा निर्णय कोणत्या आधारे घेतला याबाबत कोर्टाने माहिती दिली.

**सुनील प्रभूंच्या नियुक्तीवर कोर्टाचं भाष्य...**

सुनील प्रभूंची नियुक्ती हा वेगळा मुद्दा आहे, असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं. यावेळी कोर्टाकडून शरद यादव केसचा दाखला देण्यात आला. त्यावर विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात याचिका दाखल केली, असं कपिल सिब्बल यांनी म्हटलं.

# चंद्रपुरात ६७ शासकीय व खाजगी कार्यालयांना कारणे दाखवा नोटीस !

## 'पॉश' कायद्याची अंमलबजावणी न करणे भोवले

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६ चंद्रपूर :** कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण ( प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत व्यापक तपासणी मोहीम सुरु करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात आत्तापर्यंत ९६ शासकीय व ३३ खाजगी कार्यालये व कंपन्यांची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी नियमांची पूर्तता न केल्यामुळे ४३ शासकीय व २४ खाजगी अशा एकूण ६७ कार्यालयांना कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या आहेत.

राज्यात महिला व बाल विकास विभागाच्या वतीने जून २०२६ पासून ४ हजारांहून अधिक तपासणी अधिकाऱ्यांमार्फत शासकीय व खाजगी कार्यालये, संस्था, कंपन्या आणि त्यांच्या शाखांची तपासणी करण्यात येत आहे. राज्यात आत्तापर्यंत ३५७९ शासकीय आणि ३२९६ खाजगी अशा ६८७५ कार्यालयांची तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये नियमांची पूर्तता न केलेल्या २९४ शासकीय व ३७८  खाजगी अशा एकूण ६७२ कार्यालयांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. विहित मुदतीत आवश्यक पूर्तता न करणाऱ्या कार्यालयांवर पॉश ॲक्ट, २०१३ मधील तरतुदीनुसार ५० हजार रुपयांपर्यंत दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून, संबंधित जिल्हाधिकारी आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत ही कारवाई केली जाणार आहे. महिला व बाल विकास विभागाने जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी कार्यालये, संस्था, कंपन्या आणि त्यांच्या शाखांना पॉश ॲक्ट, २०१३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. यामध्ये केंद्र शासनाच्या ॲप-शी बॉक्स पोर्टलवर कार्यालयाची नोंदणी, अंतर्गत तक्रार समितीची स्थापना व नोंदणी, समिती सदस्याचे प्रशिक्षण, कर्मचाऱ्यांचे जनजागृती व प्रशिक्षण, तसेच वार्षिक अहवाल पोर्टलवर अद्यावत करणे बंधनकारक आहे. तपासणीदरम्यान या बाबींची पूर्तता न झाल्याचे आढळल्यास संबंधित कार्यालय, संस्था किंवा कंपनीविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे महिला व बाल विकास अधिकारी मिनाक्षी भस्मे यांनी कळविले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील ७५ हजार ६७१ शिधापत्रिका धारकांचे सवलतींचे धान्य बंद

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** अन्नधान्य पुरवठा विभागाने राबवलेल्या 'मिशन सुधार' मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील संशयास्पद ७५ हजार ६७१ शिधापत्रिका प्राधान्य गटातून, सवलतीने धान्य मिळण्याच्या, यादीमधून वगळल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्याचा स्वस्त धान्य दुकानांना होणारा गहू व तांदळाचा कोटा १०० मे. टनने कमी करण्यात आला आहे. या शिधापत्रिका कार्यरत असतील मात्र त्यांना सवलतीचे धान्य मिळणार नाही.

अपात्र, बनावट, मृत, स्थलांतरित, निष्क्रिय, प्राप्तिकर भरणारे, कुटुंबात एकमेव असलेली व्यक्ती, कुटुंबप्रमुख म्हणून ज्यांची नावे अठरा वर्षांपेक्षा कमी आहे, वाहनधारक, शंभर वर्षांपेक्षा अधिक वयाचे अशा विविध कारणांनी लाभार्थी व त्यांच्या शिधापत्रिका प्राधान्य गटाच्या यादीतून वगळण्यात आल्याची माहिती जिल्हा पुरवठा विभागाकडून देण्यात आली.

राज्य सरकारने गरजू व पात्र शिधापत्रिका धारकांना सरकारी सवलतीच्या, स्वस्त धान्याचा लाभ मिळावा तसेच अन्नसुरक्षा योजनेतील गैरव्यवहार रोखणे व बनावट शिधापत्रिका रद्द करण्यासाठी 'मिशन सुधार' ही मोहीम



सुरू केली आहे. यापुढे ही प्रक्रिया निरंतर सुरु राहणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी दिली.

राज्य सरकारकडून जिल्हा पुरवठा विभागाला प्राप्त झालेल्या यादीच्या आधारे संशयास्पद, दुबार, मृत, लाभार्थ्यांची धान्य वितरणाचे ई- पॉस यंत्र, पुरवठा निरीक्षक व स्वस्त धान्य दुकानदारांद्वारे प्रत्येक्ष तपासणी करून शिधापत्रिका प्राधान्य गटातून वगळण्यासाठी मिशन सुधार कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात एकूण ६ लाख २० हजार ७९२ शिधापत्रिका सवलतीच्या दराने धान्य मिळणाऱ्या प्राधान्य गटाच्या यादीत आहेत. त्यांना स्वस्त धान्य दुकानातून सवलतीच्या दरात गहू व तांदूळ मिळतो. सर्वाधिक शिधापत्रिका ६८ हजार ४१ शिधापत्रिका दुबार आढळल्या आहेत. प्राप्तिकर भरणारे १७८२, विविध लाभाच्या पदांवर कार्यरत असणारे २३९ शंभर वर्षांपेक्षा अधिक वयाचे ११९ लाभार्थी, निष्क्रिय शिधापत्रिका २२१६ , कुटुंब प्रमुख म्हणून अठरा वर्षांपेक्षा कमी वयाचे ५०, आधार लिंक नसलेल्या २२१०, स्वतः चे वहान असलेले ४, अशा एकूण ७५ हजार ६७१ शिधापत्रिका प्राधान्यक्रमातून वगळण्यात आल्या आहेत.

शिधापत्रिकांची प्रत्यक्ष पडताळणी राज्य सरकारने मिशन सुधार योजनेंतर्गत पडताळणी करण्यासाठी शिधापत्रिकांची यादी पाठवली होती. त्याची प्रत्यक्ष पडताळणी पुरवठा निरीक्षक व स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत करण्यात आली. दुबार निष्क्रिय, अपात्र अशा विविध कारणांनी शिधापत्रिका प्राधान्य गटाच्या यादीतून वगळण्यात आल्या आहेत. या शिधापत्रिका कार्यरत असतील मात्र त्यांना सवलतींचे धान्य मिळणार नाही.

**– हेमा बडे, जिल्हा पुरवठा अधिकारी**

# एसटी बस चा अपघात २ तरुणांचा मृत्यू

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०६, शिरपूर :** शिरपूर तालुक्यातील भाटपुरा येथील चेतन योगेश गुजर आणि कल्पेश नितीन पाटील यांचा बुधवारी रात्री सुमारे ९  वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात जागीच मृत्यू झाला.

दिनांक ५ रोजी शिरपूर चोपडा रस्त्यावरील चोपडा फाट्याजवळील पणव टेक्स्टाईल समोर एसटी बसच्या धडकेत हा भीषण अपघात झाला. अपघात इतका गंभीर होता की दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. मृत दोन्ही युवक त्यांच्या परिवारात एकटे होते. कल्पेश नितीन पाटील वय २० व चेतन योगराज गुजर वय १९ यांचा जागीच मृत्यू झाला. कल्पेश आणि चेतन जीवाभावाचे मित्र होते. चेतन गुजर याचा ५ तारखेला १९ वा वाढदिवस होता. वाढदिवसाच्या दिवशीच काळाचा घाला त्याच्यावर आला.  दिनांक पाच रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास सदर अपघात झालेला आहे. अपघात झाल्यानंतर तात्काळ भाटपुरा गावातील तरुण घटनास्थळी पोहोचले होते. यासोबत परिसरातील दहिवद, भोरखेडा, असली, अहिल्यापूर या गावातीलही तरुण अपघात ठिकाणी पोहोचले होते. सदर तरुणांचा अपघात बघून गावातील तरुण व परिसरातील तरुण प्रचंड संतापात होते. यावेळी त्यांनी चोपडा शिरपूर महामार्ग रोखून धरला होता. यावेळी थाळनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हर्षल पाटील यांच्यासह पोलीस कर्मचारी व काही सामाजिक कार्यकर्त्यांनी सदर तरुणांना शांत केले व रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास सदर तरुणांचे मृतदेह शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले. मात्र रात्री दोन वाजेपर्यंत या रस्त्यावर वाहतूक सुरळीत झालेली नव्हती.

# खाण्याच्या फुटाण्यावरून वाद गेला टोकाला ; बियर बारमध्ये दारूच्या ग्लासने डोक्यावर हल्ला

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोराडी देवी मंदिर रोडवर असलेल्या सेजल बियर बारमध्ये ५ ऑगस्ट रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास दारूच्या चकना फुटण्यावरून झालेला वाद टोकाला गेला. यावेळी आरोपीने रागाच्या भरात औषध कंपनीत कार्यरत असलेल्या एम.आर च्या डोक्यावर चक्क दारूच्या काचेच्या ग्लासने हल्ला चढवला. सदर घटनेत एम.आर. गंभीर जखमी झाला असून खापरखेडा परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

प्रभाकर फुटाणे वय ४५, रा. वॉर्ड क्र. २, दगडी चाळ जवळ खापरखेडा असे गंभीर जखमीचे नाव आहे तर दिनेश कडू वय ४८ रा वार्ड क्रमांक ५ खापरखेडा असे आरोपीचे नाव आहे.

प्रभाकर फुटाने एका औषध कंपनीत एम.आर.म्हणून कार्यरत आहेत. ५ ऑगस्ट बुधवारला रात्री ९.३० च्या सुमारास ते कोराडी देवी मंदिर रोडवरील सेजल बियर बारमध्ये गेले होते. यावेळी आरोपी दिनेश कडू बारच्या काउंटरवर दारू पित बसला होता.

दारू पित असताना दिनेश कडू याने वेटरकडे खाण्यासाठी फुटाणे मागितले त्यानंतर फुटाणे यांनी सुद्धा फुटाण्यांची मागणी केली मात्र वेटरने फुटाणे संपले आहेत असे सांगितले. यावर प्रभाकर फुटाने यांनी कडू खत्म होंगे, फुटाने नही



असे म्हटले यावरून कडू व फुटाणे यांच्यात वाद सुरू झाला.

रागाच्या भरात फुटाने यांनी शिवीगाळ केली त्यामूळे संतापलेल्या दिनेश कडू याने हातात असलेला दारूचा काचेचा ग्लास प्रभाकर फुटाने यांच्या डोक्यावर मारल्याने रक्ताने लहुलुहान झाले. तातडीने फुटाने यांना खापरखेडा येथील न्यू लाईफ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. यावेळी आरोपी दिनेश कडू याला ताब्यात घेऊन अटक केली. पुढील तपास सुरू आहे. योगायोगाने गंभीर जखमीचे आडनाव फुटाणे आहे त्यामूळे चखना फुटण्यावरून झालेला वाद खापरखेडा परिसरात चर्चेचा विषय बनला आहे.




## दोन राष्ट्रगीतांचे जनक

आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्दल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने सर ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

**- श्याम ठाणेदार**

## १७ ऑगस्टपासून नवीन मतदार नोंदणी अभियान

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०६, परभणी :** भारत निवडणूक आयोगाच्या वतीने देशभरात १७ ऑगस्ट २०२६ ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष नवीन मतदार नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व पात्र भारतीय नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक मताला अनन्यसाधारण महत्त्व असल्याने पात्र युवक-युवतींनी या मोहिमेचा लाभ घेऊन मतदानाचा घटनात्मक अधिकार मिळवावा, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे भारतीय राज्यघटनेने प्रत्येक प्रौढ नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. मात्र हा अधिकार बजावण्यासाठी मतदार यादीत नाव असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे नुकतेच १८ वर्षे पूर्ण झालेले युवक, शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी स्थलांतरित झालेले नागरिक तसेच अद्याप नाव नोंदवू न शकलेले पात्र नागरिक यांनी या विशेष अभियानात सहभागी होऊन आपली नोंदणी करून घ्यावी मतदार नोंदणीसाठी आधार कार्ड, रहिवासी दाखला, जन्मतारखेचा पुरावा (जन्म दाखला किंवा दहावीचे प्रमाणपत्र), पासपोर्ट आकाराचा फोटो आणि मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. नागरिकांना NVSP पोर्टल आणि Voter Helpline App च्या माध्यमातून ऑनलाइन अर्ज करता येणार असून, संबंधित मतदार नोंदणी केंद्रावर ऑफलाइन अर्ज करण्याची सुविधाही उपलब्ध राहणार आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक मत हे देशाच्या विकासाचा आणि सक्षम नेतृत्वाच्या निवडीचा पाया असतो. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या मतदानाच्या हक्काचा उपयोग करण्यासाठी प्रथम मतदार नोंदणी करून घेणे गरजेचे आहे.

# भ्रष्ट दानपेटी चोरट्यांना, देवाचा धाक वाटेनासा झालाय..?

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर..९८६७७३२५०४**

कुठलीही गोष्ट एकदा सरावाची, सवयीची, नेहमीची झाली की, त्याविषयी कुतूहल, भीती, आश्चर्य वाटणे संपून जाते. ती मग एक नित्याची आणि औपचारिक बाब बनून जाते, यापासून देवाचीही सुटका झालेली नाही, असे दिसत आहे. अलीकडच्या काळात अयोध्येतील राम मंदिरात दाननिधीची चोरी, केदारनाथ येथील आर्थिक घोटाळा, मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरातील दानपेटीतील पैशांचा घोटाळा, इतकेच नव्हे तर कोल्हापूर जिल्हा आदमापूर संत बाळूमामा मंदिरातील दान घोटाळा, काही नामांकित गणपती मंडळांचा आर्थिक गैरव्यवहार, हे पाहिल्यावर या देवांची व्यवस्था पाहणारी जी मंडळी आहेत, त्यांना देवाचा धाक वाटेनासा झालेला आहे की काय असे वाटू लागते.

अर्थात, या देवस्थानांची व्यवस्था पाहणारे सगळे भ्रष्ट आहेत, असे नाही. त्यामुळेच इतकी वर्षे या देवस्थानांचा कारभार चालत आला आहे. पण या व्यवस्थेतील जे लोक हा भ्रष्ट आचार करून भाविक भक्तांनी देवाला दिलेल्या दानातील रक्कम लंपास करत आहेत, हे पाहिल्यावर लोकांना असा प्रश्न पडतो, आपण आठ आठ, दहा दहा तास रांगा लावून या देवांचे दर्शन घेतो, इतके तास उभे राहून प्रतीक्षा केल्यावर सामान्य माणसाला जे दर्शन मिळते ते काही क्षणांपुरते असते. अर्थात, याला व्हीआयपी पासवाले अपवाद असतात. एक तर ते सेलिब्रिटी असतात किंवा त्यांनी आरामात दर्शन मिळण्यासाठी पैसे मोजलेले असतात. खरे तर देवाच्या दरबारी सगळे सारखेच, पण शेवटी स्टेटस आणि आर्थिक परिस्थिती देवाच्या दारी हा भेद निर्माण करत असते. देवाच्या दरबारात होणारा हा भ्रष्ट कारभार पाहिल्यावर सामान्य भक्ताला असा प्रश्न पडतो, देवाने आपले भले करावे, आपल्याकडून काही वाईट घडू नये, अशी आपल्याला सद्बुद्धी द्यावी, अशी आपण



देवाकडे प्रार्थना करत असतो. आपण काही वाईट केले तर देव आपले वाईट करेल, अशी भीती भाविकांना वाटत असते. आपल्या लहानपणीदेखील खोटे बोललात, वाईट काम केलेत तर देवबाप्पा कान कापेल, अशी भीती घालून देवभयाच्या माध्यमातून आई आपल्या मुलांना सुसंस्कारीत आणि प्रामाणिक बनवण्यासाठी धडे देत असते. देवाचा इतका जर दबदबा असेल, देव सर्वशक्तीमान असेल तर अशा भ्रष्ट लोकांना तो वेळीच का आवर घालू शकत नाही, रांगेतील भक्तांना त्याची भीती वाटते तर आपण दिलेल्या दानाची चोरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देवाची भीती का वाटत नाही, असा प्रश्न रांगेत उभे राहून देवाचे दर्शन घेणाऱ्या भक्तांना पडल्याशिवाय राहत नाही.

धर्म, श्रद्धा आणि पैसा हे तिन्ही एकत्र आले की तिथे लालसा बोकाळते. मंदिर म्हणजे फक्त दगड-मातीची इमारत नाही. ती कोट्यवधी लोकांच्या श्रद्धेचं केंद्र आहे. माणूस जेव्हा हतबल होतो, तेव्हा तो देवाचा आधार शोधतो. नोकरीसाठी, आजारातून बरे होण्यासाठी, मुलांच्या भल्यासाठी तो नवस करतो, दान देतो. हे दान म्हणजे व्यवहार नाही. ते प्रेम आहे, कृतज्ञता आहे, विश्वास आहे. देवा, तू माझे भले केलेस, मी तुला एवढे देतो ही भावना असते.आणि याच पवित्र भावनेचा बाजार काही लोक

करतात. दानपेटीत टाकलेलं प्रत्येक नाणं, ऑनलाइन ट्रान्सफर केलेले हजार रुपये, सोन्या-चांदीचे -चांदीचे दागिने हे तो देवासाठी देत असतो. पण व्यवहारात ते जातात विश्वस्त मंडळाकडे, पुजाऱ्यांकडे, व्यवस्थापनाकडे. इथेच काही जण या दानाची वाटमारी करतात. हिशोबात गोलमाल, बनावट पावत्या, दानाचा पैसा राजकारणासाठी किंवा वैयक्तिक ऐषोरामासाठी वापरला जातो.

अलीकडच्या काळात तर काही देवस्थाने पक्षीय दावणीला बांधली गेली आहेत. जेव्हा असे उघड होते तेव्हा सामान्य माणसाचा विश्वास डळमळतो. मी देवाला दिले होते, पण खाल्ले भ्रष्ट माणसाने. मग देवाची भीती त्यांना वाटत नाही का, असा प्रश्न त्याला पडतो. पहिली पातळी आहे श्रद्धेची आणि दुसरी आहे व्यवस्थेची. श्रद्धेच्या पातळीवर बघितले तर खरा भक्त कधीच घोटाळा करत नाही. जो खरोखर देव मानतो तो दुसऱ्याचा एक रुपयासुद्धा उचलत नाही. कारण त्याला देवाच्या भीतीपेक्षा देवावर विश्वास असतो. पण काही लोकांना भीतीही नसते आणि विश्वासही नसतो. कारण त्यांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातला फरक पुसून टाकला आहे. त्यांच्यासाठी मंदिर म्हणजे एक संस्था आहे, दान म्हणजे उत्पन्न आहे. देव त्यांच्यासाठी फक्त ब्रँड आहे. दुसरी पातळी आहे व्यवस्थेची. घोटाळे होतात कारण जबाबदारी आणि पारदर्शकता नाही. मोठ्या मंदिरांकडे वर्षाला शेकडो कोटींचे दान येते. सिद्धिविनायक, तिरुपती, शिर्डी यांची आकडेवारी ऐकली की डोळे विस्फारतात. इतका पैसा हाताळणारी यंत्रणा जर कागदावर पारदर्शी नसेल, ऑडिट होत नसेल, सर्वसामान्याला हिशोब दिसत नसेल तर गैरप्रकार होणारच.

कोरोना काळात अनेक मंदिरे बंद होती, तरीही दान सुरू होते. मग ते गेले कुठे? हा प्रश्न विचारणाऱ्याला आस्थेवर प्रश्न विचारू नको असे सांगितले जाते. पण आस्था आणि अंधभक्ती यात फरक आहे. गैरप्रकार करणाऱ्याला शिक्षा करण्यासाठी देवाने माणसालाच विवेक दिला आहे. कायदे दिले आहेत. जेव्हा आपण देव बघून घेईल म्हणून गप्प बसतो, तेव्हा आपणच भ्रष्ट लोकांना मोकळीक देतो. त्यामुळे दान देताना जागरूक रहायला हवे. पावती घ्यायला हवी. मंदिराचा वार्षिक अहवाल मागायला हवा. ऑनलाइन दान देत असाल तर अधिकृत वेबसाईटचा वापर करायला हवा. सरकारने आणि विश्वस्तांनी दर सहा महिन्याला खर्चाचा तपशील सार्वजनिक करायला हवा. कोणत्या कामासाठी किती खर्च झाला हे संकेतस्थळावर असले पाहिजे. तिसरे, सर्वात महत्त्वाचे, आपण देवाला मंदिरापुरता मर्यादित न करता जगण्यात आणला पाहिजे. खऱ्या अर्थाने देवाची पूजा म्हणजे दुसऱ्याला न फसवणे. गरजूला मदत करणे. प्रामाणिकपणे जगणे. कोण फसवणूक करतोय, कोण श्रद्धेचा बाजार मांडतोय हे उघडे पाडले पाहिजे. नाहीतर एक दिवस असे होईल की माणूस मंदिरात जायलाच घाबरेल. याचा विचार देवस्थानांच्या विश्वस्थांनी आणि कर्मचाऱ्यांनी करण्याची गरज आहे.

# न्यायनिवाडा 'अंतिम' टप्प्यात?

राज्यातील शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या पक्ष आणि चिन्ह याबाबत देशाच्या सर्वोच्च न्यायालयात गेल्या दोन अडीच वर्षांपासून तारीख पे तारीख चा खेळ सुरू आहे मात्र आता हा न्यायनिवाडा लवकर होईल अशी आशा निर्माण झाली आहे मात्र अंतिम निकाल लागेपर्यंत काही सांगणे कठीण आहे. जुन २०२२ रोजी महाराष्ट्रात शिवसेनेच्या आमदारांनी पक्ष सोडण्याची घटना घडली तसेच २०२३ मधे राष्ट्रवादी काँग्रेस फोडली गेली आणि राज्यात सत्तांतर झाले तेंव्हा पासून आमदारांच्या अपात्रतेसारखे लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे प्रकरण देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेकडे न्यायाच्या प्रतिक्षेत आहे. पक्षांतर बंदी कायदा, शेड्युल दहा या सगळ्यांना बगल देत आणि तत्कालीन राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष यांच्या मदतीने जे सरकार बनवले गेले आणि २०२४ मधे खुद्द सर्वोच्च न्यायालयानेच घटनाबाह्य ठरवलेल्या सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला, त्या विधानसभेने आपला कार्यकाळ देखील पुर्ण केला. लोकसभा विधानसभा आता राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका देखील पार पडल्या मात्र निकाल प्रतिक्षेतच आहे.

२०२३ मध्ये हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले तेव्हा एन.व्ही रमण्णा हे सरन्यायाधीश होते त्यानंतर यु. यु. ललित, डी. वाय चंद्रचूड, संजीव खन्ना, भुषण गवई हे पाच सरन्यायाधीश आले आणि गेले आता जस्टीस सुर्यकांत हे सहावे सरन्यायाधीश आहेत. गेल्या वर्षी १२ नोव्हेंबर ची तारीख निश्चित करतांना आता या प्रकरणी २१ जानेवारी रोजी अंतिम सुनावणी होणार असे सर्वोच्च न्यायालयानेच स्पष्ट केले होते. तारीख ठरवतांना युक्तीवादास कोणाला किती वेळ लागेल याची देखील चर्चा झाली आणि सहा तास युक्तिवादासाठी ठरले होते. २१ तारखेला सकाळी साडे अकरा वाजता सुनावणी ची वेळ ठरली मात्र हे प्रकरण सदतीसाव्या क्रमांका वर ठेवले गेले त्यामुळे सुनावणी झाली नाही. बारा मार्च ची दिलेली तारीख देखील आली आणि गेली गेली तो देखील मुहुर्त टळला. दरवेळेस फक्त प्रकरणाला खुप ऊशीर झाला आहे, प्रकरण लवकर निकाली काढायचे आहे असे सांगितले जाते पण ना निकाल लागत ना न्यायनिवाडा होत आहे. न्यायालयासमोर येणारी सर्व प्रकरणे महत्त्वाचीच असतात मात्र हे प्रकरण बाजुला ठेवुन एस आय आर, अरवली पर्वत, तसेच दिल्ली प्रदुषणासारखी आताची प्रकरणे सुनावणीसाठी घेतली गेली.




या प्रकरणाचा निकाल लवकरात लवकर लागणे का महत्वाचे तर देशातील लोकशाहीचे धिंडवडे दररोज निघत आहेत, पक्षांतर बंदी कायदा सत्ताकारणामुळे निष्प्रभ ठरत आहे त्याच बरोबर घटनेचे परिशिष्ट दहा याचे काही महत्व आहे की नाही यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे त्याच बरोबर पक्षफोडी चा जो घोडेबाजार मांडला गेला आहे त्याला या निकालाने आळा बसु शकतो. त्याच बरोबर याबाबतचा 'सर्वोच्च' न्यायनिवाडा अगोदरच झाला असता तर पश्चिम बंगाल मधे खेला होऊ शकला नसता कि 'आप' च्या खासदारांचे पक्षांतर झाले नसते कि पुन्हा एकदा शिवसेनेच्या खासदारांनी कदाचित पक्षांतर केले नसते. निवृत्त सर न्यायाधीश चंद्रचूड, गवई यांच्या कडुन अपेक्षा होत्या मात्र ते देखील आले आणि गेले. आताचे सर न्यायाधीश जे. सुर्यकांत हे २०२७ च्या सुरुवातीला निवृत होत आहे किमान त्यांच्या कारकिर्दीत तरी बहुप्रतीक्षित, बहुप्रलंबित न्यायनिवाडा होणार का? पण हा न्यायनिवाडा अंतिम टप्प्यात आला आहे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे.**
**९१५८४९५०३७**

### आदर

जाणा जन भावना
करावीनेहमी कदर
मूल्यसर्वोच्च जाणं
मतप्रवाहाचाआदर

कृतीउक्ती एकरूप
नसावा रे आडपदर
खुलेपणा विचारात
स्वागता लालचादर

सामावे परप्रमादही
विशाल ठेवावे उदर
सवयहवी श्रवणाची
ना रेटी आपले सदर

असो अंतरंगअथांग
उथळ वाटो समिंदर
दृष्टी हवी जगण्यात
जीवन हे अति सुंदर

आपण रे यश्कचित
सूर्या पुढे जसा धुंदर
निष्प्रभ रे काळापुढे
बलाढ्य तो सिकंदर

कधीवावटळीतूनही
सुटूनजातात धुरंधर
सापळ्यांअडकू पडे
कधी असून बिलंदर

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... तमी

# अलीकडे देशात अल्पावधीत अनेक पूल कोसळण्याच्या घटना

गेले आठवडाभर गडचिरोली भागात मुसळधार पाऊसाचा वर्षाव होत आहे. गडचिरोली येथे कोठी कोरणार पुलाला याचा मोठा धक्का बसला. या पुलाचा मोठा भाग पुराच्या पाण्यात खचून वाहून गेला त्यामुळे या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली. पुलाचे आयुष्य अवघे तीन वर्षाचे होते. महाराष्ट्र व छत्तीस गड या दोन राज्याला जोडणारा हा पूल होता. त्याचे उदघाटन १५ ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले होते. विशेष म्हणजे १५ पैकी पाच पिलर कोसळले या पुलाचा खर्च चार कोटी रुपये आल्याचे कळते. बिहार राज्यात तर पूल कोसळण्याच्या अनेक घटना आहेत. सन २०२१ ते २०२५ या पाच वर्षाच्या काळात बिहार राज्यात तब्बल २६ पूल कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत यामुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे ही;बातमी नुकतीच वाचण्यात आली.

बांधकामातील हलगर्जी पणा यासाठी कारणीभूत आहे. पूर्वीच्या काळातील बांधकामाचा दर्जा वाखाणण्या सारखा होता. महाराष्ट्रात तर गेली सुमारे शंभर वर्षाचे अनेक पूल दिमाखात उभे आहेत. सांगली येथे कृष्ण नदीवर असलेला पूल शंभर वर्षे होऊनही आज चांगल्या स्थितीत आहे. हा दर्जा अलीकडच्या पुलाला का प्राप्त होत नाही ? हा खरा प्रश्न आहे कृष्णां नदीला दरवर्षी मोठा पूर येतो अशा पुराशी सामना देत हा पूल उभा आहे मग अलीकडचेच पूल लवकर का पडतायेत ? पुलासाठी वापरलेले सिमेंट, त्याचे बांधकाम याचे व्यवस्थित ऑडिट झाल्याशिवाय तो पूल वापरासाठी खुला करू नये संबंधितविभागाच्याअधिकाऱ्यांना याबाबतीत जबाबदार धरावे तरच अशा घटना पुनः होणार नाहीत.

**- शांताराम वाघ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### मिरा-भाईंदरमधील जीवघेण्या खड्ड्यांविरोधात शिंदे शिवसेनेचे तीव्र आंदोलन!




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०६, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवर पडलेल्या जीवघेण्या खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, अपघातांचा धोका वाढला आहे. रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत, यासाठी शिवसेनेच्या वतीने प्रशासनाला देण्यात आलेले ४८ तासांचे अल्टिमेटम संपले आहे. मात्र, अल्टिमेटमची मुदत संपूनही अनेक रस्त्यांवरील खड्डे कायम असून, नागरिकांच्या सुरक्षेबाबत प्रशासनाकडून अपेक्षित गांभीर्य दाखवले जात नसल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे.

नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या या परिस्थितीला जबाबदार असलेल्या पालिका प्रशासनाला जाब विचारण्यासाठी आणि तातडीने खड्डे बुजवण्याची मागणी करण्यासाठी शिवसेनेच्या वतीने

काशीगाव मेट्रो स्थानक, मिरा रोड दिनांक: गुरुवार, ०६ ऑगस्ट २०२६ करण्यात आले.

**खड्डे बुजवा, नागरिकांचे जीव वाचवा :** निष्काळजी प्रशासनाचा जाब घेतल्याशिवाय शिवसेना शांत बसणार नाही

या आंदोलनात शिवसेना पदाधिकारी, महिला व पुरुष कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होते.

---

### कर्जत पळसदरी डॅमजवळ भीषण अपघात तरुणीचा जागीच मृत्यू, दुचाकीस्वार गंभीर जखमी



**अक्षराज : जयेश जाधव**


**दि.०६, कर्जत :** कर्जत-खोपोली (राज्य महामार्ग ५४८-अ) मार्गावरील पळसदरी डॅमजवळ गुरुवार (दि. ६ ऑगस्ट) रोजी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील एका तरुणीचा जागीच मृत्यू झाला, तर दुचाकी चालक गंभीर जखमी झाला आहे. या दुर्घटनेनंतर अर्धवट राहिलेल्या रस्त्याच्या कामावर आणि अपुऱ्या सुरक्षा व्यवस्थेवर स्थानिक नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त करत संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ताकई येथील मित्रांचा एक गट साजगाव येथील चालकासह माथेरानच्या दिशेने जात होता. त्याचवेळी पळसदरी येथील अरुंद रस्त्यावर समोरून येणाऱ्या रोहित वाघमारे (रा.पोशीर) यांच्या दुचाकीची वॅगनर कारशी समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीवर मागे बसलेली अंबरनाथ येथील सोनाली हिला गंभीर दुखापत होऊन तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर दुचाकी चालक रोहित वाघमारे गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

या मार्गावर यापूर्वीही अनेक गंभीर अपघात झाले असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे पळसदरीचा अर्धवट रस्ता आणखी किती जणांचा बळी घेणार? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

या अपघाताप्रकरणी कर्जत पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

---

### 'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत नवी मुंबईत देशभक्तीपर उपक्रमांची रेलचेल



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, नवी मुंबई :** 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' अंतर्गत केंद्र सरकारच्या वतीने सन २०२२ पासून 'हर घर तिरंगा' ही अभिनव मोहीम सुरू करण्यात आलेली आहे. जनतेच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढविणे ही या मोहीमेची मुख्य संकल्पना असून या मोहीमेला आता लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त होताना दिसत आहे. या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या सूचनेनुसार यावर्षीही 'हर घर तिरंगा' ही मोहीम ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येत असून यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका विविध उपक्रम राबवित सहभागी होत आहे. यावर्षी 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण होत असल्याने या मोहीमेची संकल्पना या गीताशी जोडलेली आहे. त्याचप्रमाणे १४ ऑगस्ट २०२६ रोजी 'फाळणी भयावहता स्मृती दिन' पाळण्यात येणार आहे.

याबाबत शासन आदेशानुसार महानगरपालिका स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी याविषयी विशेष बैठक घेत संबंधित विभागांना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली शासकीय परिपत्रकानुसार विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले. या अंतर्गत शहरातील घरांवर, व्यवसाय/ कार्यालयांच्या ठिकाणी दि. ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत तिरंगा ध्वज फडकविणे अपेक्षित असून नागरिकांनी तिरंगा सेल्फीसह त्याची छायाचित्रे काढून 'सेल्फी विथ तिरंगा' उपक्रमात सहभागी व्हावे तसेच हरअॅसहरऑेंळअॅरपसर२०२६ या हॅशटॅगसह सोशल मिडियावर छायाचित्रे अपलोड करावीत असे आवाहन करण्यात येत आहे. याप्रमाणेच हर घर तिरंगाच्या वेबसाईटवर जाऊन स्वयंसेवक नोंदणी करावी आणि स्वयंसेवक प्रमाणपत्र डाऊनलोड करून घ्यावे असेही आवाहन करण्यात येत आहे.

नागरिकांना तिरंगा ध्वज सुलभतेने उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयांमध्ये विशेष कक्ष सुरू करण्यात येत असून त्याठिकाणी सवलतीच्या दरात नागरिकांना ध्वज उपलब्ध होण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. याशिवाय सर्व शाळांमध्ये त्यांच्या परिसरात तिरंगा रॅली काढून जनजागृती करणे तसेच चित्रकला, निबंध अशा स्पर्धांचे आयोजन करून त्याचप्रमाणे अनुषांगिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत करण्यात येणार आहे. मुख्यालय स्तरावरूनही महापौर सुजाता पाटील व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत तिरंगा रॅली, तिरंगा सायकल रॅली असे जनजागृतीपर उपक्रम लोकसहभागातून राबविण्याचे नियोजन आहे. आदेशानुसार 'हर घर तिरंगा' मोहीम नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उत्साहाने राबविण्यात येत असून यामध्ये विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह सर्व घटकांच्या व्यापक सहभागावर भर देण्यात येत आहे.

---

## दैनिक अक्षराज चे पत्रकार वसंत रांधवण यांना अक्षराज सत्यशोधक पत्रकारिता पुरस्कार जाहीर

### पत्रकार भवन पुणे येथे पुरस्कार वितरण सोहळा



**अक्षराज : राजकुमार ईकडे**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल रहिवासी पारनेर चे भूमिपुत्र तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पारनेर तालुका उपाध्यक्ष व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष पत्रकार वसंत भानुदास रांधवण यांची राज्यातील अक्षराज मिडिया समूह यांच्यावतीने दिला जाणारा अक्षराज सत्यशोधक पत्रकारिता पुरस्कार २०२६ करिता नुकतीच निवड करण्यात आली असल्याचे अक्षराज मिडिया समुहाचे अध्यक्ष व मुख्य संपादक विनोद गोरे व सहसंपादिका प्राजक्ता चव्हाण - गोरे यांनी वसंत भानुदास रांधवण यांना निवडीचे पत्र देऊन कळविले आहे. गुरूवार, दि.१४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पत्रकार भवन नवी पेठ (पुणे) या ठिकाणी विविध क्षेत्रातील नामवंत लेखक व कवी आणि मान्यवरांच्या हस्ते दैनिक अक्षराज वर्धापनदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यात सत्यशोधक पत्रकारिता पुरस्कार २०२६ देऊन वसंत रांधवण यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

गेल्या काही वर्षांत पत्रकारिता क्षेत्रात समाजासाठी प्रमाणीकपणे आणि निस्वार्थ समर्पित भावनेने केलेलं कार्य तसेच सातत्यपूर्ण कामगिरी केल्याबद्दल आम्ही अक्षराज मिडिया समुहाकडून वसंत रांधवण यांना राज्यस्तरीय सत्यशोधक पत्रकारिता पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला असल्याचे मुख्य संपादक विनोद गोरे यांनी सांगितले. दैनिक अक्षराज समाजातील मानबिंदू असलेल्या चिखली, ता.चिखली जिल्हा बुलढाणा येथून प्रकाशित होत असलेले भारत सरकार नोंदणीकृत असलेले अक्षराज मिडियाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

दरवर्षी पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांना वर्धापनदिनाच्या दिवशी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते असल्याचे गोरे यांनी सांगितले.हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष बाळासाहेब खिलारी पारनेर तालुक्यातील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष संतोष तांबे, तालुका सचिव संतोष कोरडे गंगाधर धावडे, राजकुमार ईकडे,संपत वैरागर यांसह जिल्ह्यातील पत्रकारांनी, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी वसंत रांधवण यांचे अभिनंदन केले आहे.

---

## चुनाभट्टी आणि विसापूरच्या प्रेमाचे ऋण विकासातून फेडणार; आ.मुनगंटीवार यांची भावनिक ग्वाही




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** चुनाभट्टी आणि विसापूरच्या जनतेने मला नेहमीच निस्सीम प्रेम, विश्वास आणि आपुलकी दिली. हे प्रेमच माझ्या सार्वजनिक जीवनाची खरी ताकद असून, या प्रेमाचे ऋण मी गावाच्या सर्वांगीण विकासातून फेडत राहीन, अशी ग्वाही आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. चुनाभट्टी, ता. बल्लारपूर येथे त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार समारंभ, अभिष्टचिंतन सोहळा आणि शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी चुनाभट्टी येथील भगवान श्रीकृष्ण मंदिरासमोर सभागृह उभारणे, गावाकडे येणारा मुख्य रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करणे आणि तरुणांच्या मागणीनुसार अत्याधुनिक जिम उभारणे, या महत्त्वपूर्ण घोषणा करत परिसराच्या सर्वांगीण विकासाचा निर्धार व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि ग्रामस्थांनी आ. मुनगंटीवार यांचे उत्स्फूर्त स्वागत करत वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, सन १९८८ मध्ये प्रथमच चुनाभट्टी येथे येण्याचा योग आला. त्या दिवसापासून या गावाशी निर्माण झालेले जिव्हाळ्याचे नाते आजही तितकेच दृढ आहे. चुनाभट्टी, येथील जनता आणि परिसर माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय आठवण असून, येथील कार्यकर्त्यांनी प्रत्येक वेळी प्रेमाचा वर्षाव केला आहे. जनतेने दाखविलेला विश्वास हेच माझ्या कामाची प्रेरणा असल्याचे त्यांनी नमूद केले.

चुनाभट्टी आणि विसापूर परिसरात झालेल्या विकासकामांचा आढावा घेताना आ. मुनगंटीवार यांनी सांगितले की, गावकऱ्यांच्या मागणीनुसार पाण्याची टाकी, अंतर्गत रस्ते, ग्राम पंचायत इमारत, सामाजिक सभागृह आदी सुविधा उभारण्यात आल्या. विसापूरमध्ये पहिल्याच कार्यकाळात सिमेंट रस्त्यांचे जाळे उभारण्यात आले. प्रभाग संघासाठी २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. आता या विकास प्रवासात आणखी भर घालत चुनाभट्टी येथे सभागृह, सी.सी. रस्ता आणि जिम उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

परिसरातील औद्योगिक आणि आर्थिक विकासावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, बल्लारपूर शहराला पेपर मिलमुळे औद्योगिक ओळख मिळाली. आता विसापूर पॉवर हाऊसच्या जागेवर एसआरपीएफचे केंद्र उभे राहत असून, त्यामुळे या भागात नव्या आर्थिक घडामोडींना चालना मिळणार आहे. यामुळे रोजगाराच्या संधी वाढून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ मिळेल, असा विश्वास आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

तरुणाईच्या भवितव्यावर बोलताना आ.सुधीर मुनगंटीवार यांनी मिशन शौर्यच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांनी एव्हरेस्ट सर केल्याचा अभिमान व्यक्त केला. मिशन ऑलिम्पिक २०३६ च्या माध्यमातून चंद्रपूर जिल्ह्यातील तरुण जागतिक स्तरावर पदक जिंकतील, असा विश्वास व्यक्त करत क्रीडा क्षेत्रासाठी उभारण्यात आलेल्या स्टेडियमसह धनुर्विद्या केंद्रासाठी ८.५० कोटी रुपयांची मंजुरी मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमात आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते चुनाभट्टी येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. सिमरन नाग, पूनम नाग, माही आत्राम, कृतिका राठोड, अनुराधा तिवारी, साक्षी यादव, मानवी नैताम आणि वनराज मडावी या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले. तसेच नागरिकांना छत्र्यांचेही वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, किशोर पंदीलवार, पिंटू देऊळकर, रमेश पिपरे, अशोक थेरे, संदीप पोडे, श्रीमती विद्या देवाडकर, भारत जीवने, गणेश टोंगे, अंजली पंदीलवार, सुरेखा ईटणकर, रमेश लिंगमपल्लीवार, विद्या गेडाम, सविता डाहूले, शशिकला जीवने, अशोक देशमुख यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

---

## मांडवगण फराटाने पटकावला 'स्व.अजितदादा पवार स्मृती चषक'




### आ.दाते यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव

> स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित ही क्रिकेट स्पर्धा म्हणजे युवकांना एकत्र आणणारा आणि त्यांच्या क्रीडा गुणांना वाव देणारा उपक्रम आहे. आ. काशिनाथ दाते सरांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस समाजहिताची बांधिलकी अधिक प्रभावीपणे जपत आहे.
>
> **– अशोक सावंत, (जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** स्व.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहानिमित्त पारनेर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांपैकी स्व. अजितदादा पवार स्मृती चषक पावसाळी क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आणि बक्षीस वितरण सोहळा राळेगण थेरपाळ येथे उत्साहात पार पडला.

अंतिम लढत साईराम ११, शिरूर विरुद्ध मांडवगण फराटा या दोन बलाढ्य संघांमध्ये झाली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या साईराम ११ ने ७३ धावांचे आव्हान उभे केले. मात्र हे आव्हान मांडवगण फराटा संघाने संयमी आणि आक्रमक फलंदाजीच्या जोरावर पार करत मानाचा स्व.अजितदादा पवार स्मृती चषक आपल्या नावावर केला. शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या या सामन्याने क्रीडाप्रेमींना खिळवून ठेवले. स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देत विजेता व उपविजेत्या संघांना पारितोषिके प्रदान केली.

यावेळी त्यांनी गगनभेदी घोषणांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले - अमर रहे... अमर रहे... अजितदादा अमर रहे...! एकच वादा... अजितदादा...!

आ. दाते म्हणाले, स्वर्गीय अजितदादा पवार यांनी युवकांना नेतृत्व, विकास आणि समाजसेवेची प्रेरणा दिली. क्रीडा स्पर्धा म्हणजे केवळ मनोरंजन नसून, त्यातून युवकांमध्ये शिस्त, संघभावना आणि जिद्द निर्माण होते. अशा विधायक उपक्रमांमधूनच सक्षम आणि सुसंस्कृत पिढी घडते. विकास पवार व सहकाऱ्यांनी केलेले आयोजन निश्चितच कौतुकास्पद आहे. या सोहळ्याला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, जि.प. माजी सदस्य वसंतराव चेडे, जिल्हा सरचिटणीस सुधामती कवाद, लाडकी बहीण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, नगरसेवक अशोक चेडे, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विकास पवार, नाणू सोनवणे, मोतीराम कारखिले, मयूर तिखोळे आणि राळेगण थेरपाळच्या कार्यकर्त्यांनी मोलाचे परिश्रम घेतले. शिस्तबद्ध नियोजन आणि भव्य पारितोषिकांमुळे या स्पर्धेने तालुक्यात वेगळी ओळख निर्माण केली.

---

## व्हाईस ऑफ मेडियाच्या राज्य कार्यकारिणीत अहिल्यानगरच्या दोघांची वर्णी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६,अहिल्यानगर :** पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि सक्षमीकरणासाठी कार्यरत असणाऱ्या व्हाईस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या राज्यकार्यकारिणीमध्ये संगमनेरचे पत्रकार गोरक्ष नेहे यांची राज्य संयोजकपदी तर श्रीगोंदा येथील महिला पत्रकार गायत्री ढवळे यांची राज्य कोषाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली असल्याची घोषणा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे व प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के यांनी केली.

गोरक्ष नेहे हे गेल्या सुमारे वीस वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, त्यांनी विविध सामाजिक, विकासात्मक आणि लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने प्रभावी पत्रकारिता केली आहे. व्हाईस ऑफ मीडिया मध्ये त्यांनी मागील २ ते ३ वर्षे अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत संघटनात्मक कार्याला गती दिली. राज्यस्तरीय अधिवेशने, क्रेडर कॅम्प तसेच विविध संघटनात्मक उपक्रमां मध्ये सक्रिय सहभाग घेत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय सचिव दिव्या भोसले, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, राज्य संचालक गोरक्षनाथ मदने, सर्व विंगचे प्रमुख अमोल मतकर तसेच जिल्हाध्यक्ष बाळासाहेब गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली नेहे यांनी संघटनेत प्रभावीपणे कार्य केले आहे. तर श्रीगोंदा येथील महिला पत्रकार गायत्री ढवळे यांनीही संघटनेच्या कार्यात सक्रिय सहभाग घेत काम केलेले आहे. नेहे आणि ढवळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पंढरपूरच्या प्रशासकीय बळकटीला मोठी चालना; अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाला मंजुरी

## मुख्यमंत्री यांच्याकडून आ.आवताडे यांच्या पाठपुराव्याचे कौतुक

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** पंढरपूरच्या प्रशासकीय विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्य शासनाने पंढरपूर येथे अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाला मंजुरी दिली आहे.

या निर्णयानंतर पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले असून, मुख्यमंत्री यांनीही आवताडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे आणि मतदारसंघाच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे विशेष कौतुक केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार समाधान आवताडे यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे की, पंढरपूर हे देशभरातील लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असून वर्षभर येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ असते. यात्राकाळात कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाची गरज दीर्घकाळापासून



जाणवत होती. या सर्व बाबींचा विचार करून राज्य शासनाने हे कार्यालय मंजूर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.मुख्यमंत्र्यांनी पत्रात पुढे म्हटले आहे की, या कार्यालयासाठी आमदार समाधान आवताडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दाखविलेली तळमळ आणि प्रशासनाकडे केलेले प्रभावी प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. या कार्यालयामुळे पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला, माळशिरस तसेच परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम, जलद आणि परिणामकारक पोलीस सेवा उपलब्ध होणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.याचबरोबर आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालय आणि महसूल विभागाचे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याची मागणीही शासनाकडे लावून धरली आहे. या दोन्ही कार्यालय संदर्भात शासन स्तरावर सकारात्मक हालचाली सुरू असल्याची माहिती समोर येत असून, लवकरच या मागण्यांनाही मंजुरी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या पंढरपूर, मंगळवेढा आणि परिसरातील नागरिकांना वाहन नोंदणी, वाहन परवाने, वाहन हस्तांतरण, महसूल विषयक विविध कामांसाठी सोलापूरला जावे लागते. प्रस्तावित कार्यालये पंढरपूरमध्ये सुरू झाल्यास नागरिकांचा वेळ, प्रवासाचा खर्च आणि प्रशासकीय गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

> पंढरपूरचा वाढता प्रशासकीय दर्जा!अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाला मंजुरी मिळाल्यानंतर आता आरटीओ उपप्रादेशिक कार्यालय आणि महसूल अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्थापनेची प्रक्रिया ही वेगाने पुढे सरकत आहे. ही तीनही कार्यालये कार्यान्वित झाल्यास पंढरपूर शहराचा प्रशासकीय दर्जा उंचावणार असून नागरिकांना अनेक शासकीय सेवांसाठी सोलापूरची धाव घ्यावी लागणार नाही.

अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मंजुरीनंतर आता आरटीओ उपप्रादेशिक कार्यालय आणि महसूल अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयालाही हिरवा कंदील मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे पंढरपूरला विभागीय स्तरावरील महत्त्वाच्या प्रशासकीय सुविधा उपलब्ध होण्याच्या दिशेने हा मोठा टप्पा मानला जात असून, स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे.

# खापरखेड्यात '१० कोटी नशामुक्त संकल्प महाअभियान' अंतर्गत विविध शाळा व पोलीस ठाण्यात जनजागृती कार्यक्रम

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** प्रजापिता ब्रह्माकुमारीज यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मिशन स्पंदनच्या सहकार्याने '१० कोटी नशामुक्त संकल्प महाअभियान' अंतर्गत खापरखेडा परिसरातील विविध शैक्षणिक संस्था व खापरखेडा पोलीस ठाण्यात व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अभियानाअंतर्गत हसनूर कॉन्व्हेंट इंग्लिश हायस्कूल, शंकरराव चव्हाण विद्यालय, महाराष्ट्र विद्यालय, प्लाझ्मा पब्लिक स्कूल तसेच खापरखेडा पोलीस ठाणे येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. या उपक्रमाद्वारे एकूण ५००० विद्यार्थ्यांना जनजागृती संदेश देण्यात आला. कार्यक्रमांचा मुख्य उद्देश विद्यार्थी, शिक्षक, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये व्यसनाच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण करून व्यसनमुक्त, निरोगी व सुसंस्कारित भारत घडविण्याचा संदेश देणे हा होता.

यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारीजच्या प्रतिनिधींनी व्यसनामुळे होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक दुष्परिणाम सविस्तरपणे समजावून सांगितले. व्यसन हे व्यक्तीबरोबरच संपूर्ण कुटुंब आणि समाजाच्या प्रगतीलाही बाधा आणते. त्यामुळे युवकांनी व्यसनापासून दूर राहून शिक्षण, संस्कार आणि सकारात्मक जीवनमूल्यांचा स्वीकार करावा, असे आवाहन करण्यात आले. सर्व शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच खापरखेडा पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी व्यसनमुक्त,



निरोगी, सुसंस्कारित आणि विकसित भारत घडविण्याचा सामूहिक संकल्प केला. स्वतः व्यसनमुक्त राहण्याबरोबरच समाजातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याची प्रतिज्ञा सर्वांनी घेतली.

या अभियानामुळे विद्यार्थी, पालक आणि नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण झाली असून अशा उपक्रमांमुळे समाजात चांगला संदेश पोहोचत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. याप्रसंगी ब्रह्माकुमार मंगेश भैय्या, ब्रह्माकुमारी संगीता दीदी, शिलू दीदी, चंद्रिका दीदी, रुपेश भैय्या, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच खापरखेडा पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# इतिहासाच्या पाऊलखुणांवर ७०० शिवभक्तांची अभिमानाची वाटचाल

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०६, सोलापूर :** हिंदवी परिवार आयोजित पन्हाळा – पावनखिंड पावसाळी पदभ्रमंती मोहिमेचा पावनखिंडच्या पवित्र शौर्यभूमीत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात समारोप झाला. छत्रपती शिवाजी महाराज, नरवीर शिवा काशीद आणि वीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या अद्वितीय पराक्रमाला मानवंदना अर्पण करण्यासाठी आयोजित या ऐतिहासिक मोहिमेत राज्यभरातील तब्बल ७०० हून अधिक शिवभक्त सहभागी झाले. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सुमारे १८० शिवभक्तांचा उल्लेखनीय सहभाग होता.

इतिहास, राष्ट्रभक्ती, शौर्य आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम ठरलेल्या या मोहिमेने युवकांमध्ये स्वराज्याचा अभिमान जागवतानाच इतिहासातून प्रेरणा घेऊन राष्ट्रबांधणीसाठी कार्य करण्याचा संदेश दिला. पावसाच्या सरी आणि जय भवानी... जय शिवाजी...च्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. इतिहासाच्या साक्षीने शिवभक्तांनी पन्हाळा ते पावनखिंड हा ऐतिहासिक प्रवास पूर्ण करत स्वराज्याच्या शौर्यगाथेला प्रत्यक्ष अनुभवले.

या पदभ्रमंतीतून छत्रपती शिवाजी महाराजांचे दूरदर्शी नेतृत्व, वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे अद्वितीय शौर्य आणि नरवीर शिवा काशीद यांचे स्वराज्यासाठीचे सर्वोच्च बलिदान प्रत्येक सहभागीपर्यंत प्रभावीपणे पोहोचले.

मोहिमेदरम्यान हिंदवी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवरत्न शेटे यांनी मसई पठार येथे पूर्वार्धात आणि पावनखिंड येथे समारोपप्रसंगी उत्तरार्धात प्रेरणादायी व्याख्यान दिले. त्यांनी शिवचरित्र, स्वराज्याचा इतिहास, छत्रपती शिवाजी महाराज व नरवीर शिवा काशीद यांच्यातील अल्पावधीत निर्माण झालेला विश्वास, बाजीप्रभू देशपांडे यांच्या पराक्रमाची गाथा आणि राष्ट्रप्रेमाचे महत्त्व अत्यंत प्रभावीपणे उलगडून सांगितले. इतिहास हा केवळ वाचनाचा विषय नसून तो आचरणात आणण्याची प्रेरणा देणारा आहे. युवकांनी इतिहास, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्रहितासाठी सदैव कार्यरत राहावे, असे आवाहन त्यांनी केले.समारोप सोहळ्यात नागपूरच्या शिवभक्तांनी सादर केलेल्या मर्दानी कलेच्या थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. या समारोप सोहळ्यास भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक,



आमदार बच्चू कडू, आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्रचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे, जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे, न्यायाधीश सुनील भोसले, न्यायाधीश ईश्वर सूर्यवंशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी हिंदवी परिवाराच्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा ऐतिहासिक मोहिमा राष्ट्रबांधणीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी समाजकार्य आणि शिवकार्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल श्री स्वामी समर्थ केंद्र दिंडोरीचे गुरुमाऊली पुत्र आबासाहेब मोरे यांना हिंदवी परिवाराचा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय 'सह्याद्रीभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. दैनिक लोकमतचे संपादक सचिन जवळकोटे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले.ही मोहीम यशस्वी करण्यासाठी डॉ. सुप्रज्ञा शेटे, मोहीम सरनोबत डॉ. संभाजी भोसले, भूषण बापट, महेश शिंदे, अर्चना शिंदे, धारेश्वर तोडकरी, हितेश डफ, हिंदवी परिवाराचे सोलापूर जिल्हाप्रमुख सोमनाथ शिंदे, शहरप्रमुख तुषार आवताडे, विजय पोखरकर, श्रीकांत पाटील, संतोष शेटे, दिलीप मेसरे, शंभू लेंगरे, समाधान आवताडे तसेच सर्व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.इतिहासाचा जागर, शिवभक्तीची प्रेरणा, राष्ट्रप्रेमाचा संदेश आणि सामाजिक ऐक्याची नवी ऊर्जा देणारी ही पन्हाळा–पावनखिंड पावसाळी पदभ्रमंती मोहीम सहभागी शिवभक्तांच्या कायम स्मरणात राहील, असा विश्वास समारोपप्रसंगी व्यक्त करण्यात आला.

# जनता विद्यालय नांदुर्डी येथे 'नशामुक्त भारत' अभियानांतर्गत प्रबोधन, वृक्षारोपण संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६,नांदुर्डी (नाशिक) :** स्थानिक जनता विद्यालय नांदुर्डी येथे 'नशामुक्त भारत' अभियानांतर्गत सायबर क्राईम, व्यसनमुक्ती आणि लैंगिक अत्याचार प्रतिबंध या विषयांवर विशेष समुपदेशन सत्र तसेच वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी निफाड तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अभिजीत सोनवणे आणि त्यांच्या टीमने विद्यालयाला



भेट देऊन उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात सोनवणे यांनी शालेय वयात होणाऱ्या सायबर गुन्ह्यांचे स्वरूप, सोशल मीडिया व मोबाईल ॲप्सचा अतिवापर आणि त्यांचे विद्यार्थी जीवनावर होणारे घातक परिणाम यावर प्रकाश टाकला. मोबाईल तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर कसा करावा, विविध डिजिटल प्रलोभनांपासून कसे सावध राहावे, तसेच व्यसनाधीनता आणि लैंगिक अत्याचारासारख्या गंभीर समस्यांपासून स्वतःचे रक्षण कसे करावे, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मोलाचा सल्ला दिला.प्रबोधन सत्रानंतर शालेय आवारात वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. पोलीस निरीक्षक अभिजीत सोनवणे, विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.डी.म्हसकर, पर्यवेक्षिका श्रीमती रणशूर, ज्येष्ठ शिक्षक डी.जी.जाधव, व्ही.के.पवार, एन.जी.डुकरे, एन.पी.निकम यांच्यासह विद्यालयातील इतर शिक्षक व मान्यवरांच्या हस्ते विविध रोपांची लागवड करण्यात आली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, सुरक्षितता आणि पर्यावरणाविषयी जनजागृती होण्यास मदत झाली. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या

# चिमुर तालुका शारिरीक शिक्षक क्रीडा सभा संपन्न



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०६, चिमूर :** क्रीडा व युवक संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा परिषद चंद्रपूर तथा जिल्हा क्रीडा कार्यालय चंद्रपूर द्वारा आयोजित क्रीडास्पर्धा पचायत समिती चिमुर व चिमुर तालुका क्रीडा समिती द्वारा सत्र २०२६ –२७ या सत्रातील १४,१७,१९ वयोगटातील मुला मुलींच्या विविध स्पर्धाचे आयोजन व नियोजन संदर्भातील सभा श्री संत भय्यु महाराज विद्यालय चिमुर येथे सचिनभाऊ पिसे मुख्याध्यापक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या सभेला विठ्ठलराव भालेकर चिमुर तालुका क्रीडा अधिकारी व वाल्मीक खोब्रागडे जिल्हा क्रीडा संयोजक, प्रतिक पाटील कब्बडी प्रशिक्षक चंद्रपूर यांचे मार्गदर्शन लाभले.

याप्रसंगी भास्कर बावणकर तालुका संयोजक, एकनाथभाऊ थुटे समिती सदस्य, शदुर्योधन रोकडे सह संयोजक, विलास श्रीरामे, किशोर हजारे मुख्याध्यापक, प्रमोद धारणे, सत्यवान रामटेके, वैशाली येसांबरे, हितेश डेंगरे, विलास गजभिये, संदानंद मेश्राम, ईश्वर वलके, सचिन तपासे, मनोहर वाटगुरे, खार्पेडै, डॉ.सुशांत इंदोरकर, वाय एम मेश्राम, पुर शंभरकर, नागदेवते, नागपुरे, झोटिंग प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दुर्योधन रोकडे, संचालन प्रविण घ्यार तर आभारप्रदर्शन पुरुषोत्तम धारणे यांनी मानले.

# लासलगाव बाजार समितीत टोमॅटो हंगामाचा नारळ फोडला खरेदी-विक्रीला उत्साहात प्रारंभ...



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, लासलगाव (नाशिक) :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या 'परम पूज्य भगरीबाबा धान्य व भाजीपाला मुख्य बाजार आवारावर' या चालू हंगामातील टोमॅटो खरेदी-विक्रीच्या व्यवहारांना मंगळवार, दि. ४ ऑगस्ट २०२६ पासून उत्साहात सुरुवात झाली आहे. लासलगावसह परिसरातील निफाड, चांदवड, नांदगाव, येवला, सटाणा, देवळा, कळवण, मालेगाव, सिन्नर, कोपरगाव, राहुरी, राहाता आणि नेवासा या तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर टोमॅटोचे उत्पादन घेतात. या भागातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हक्काची बाजारपेठ मिळावी, या उद्देशाने बाजार समितीतर्फे गेल्या ३० वर्षांपासून दरवर्षी टोमॅटो हंगामाचे आयोजन केले जाते.

लिलावाच्या पहिल्याच टप्प्यात टोमॅटोला प्रति क्रेट्स (२० किलो) कमीत कमी ५१ रुपये, जास्तीत जास्त ५११ रुपये, तर सरासरी ३५० रुपये असा दर मिळाला आहे.

**शेतकऱ्यांना प्रतवारीचे आवाहन आणि सुविधा :**

**योग्य प्रतवारी करा :** शेतकऱ्यांनी टोमॅटो बाजारात आणताना मोठा (सुपर/एक नंबर), मध्यम, लहान (गोल्टी) आणि बदला (बिलबिला, तडकलेला किंवा खरचटलेला) अशी योग्य प्रतवारी करून २० किलोच्या क्रेट्समध्येच विक्रीस आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**तब्बल रोख पेमेंट :** टोमॅटो लिलाव झाल्यानंतर लगेचच संगणकीय/इलेक्ट्रॉनिक काट्यावर चोख वजनमाप करून शेतकऱ्यांना तत्काळ रोख रक्कम अदा केली जाणार आहे.

**व्यापाऱ्यांसाठी सुवर्णसंधी :** टोमॅटो खरेदीसाठी उत्सुक असलेल्या नवीन व्यापाऱ्यांनी परवान्यासाठीच्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता केल्यास, त्यांना तात्काळ परवाना देऊन मालाची प्रतवारी व पॅकिंगसाठी आवश्यक ती जागा उपलब्ध करून दिली जाईल.

शेतकरी बांधवांनी आपला टोमॅटो योग्य पद्धतीने प्रतवारी करून लासलगाव मुख्य बाजार आवारावर विक्रीसाठी आणावा आणि या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समिती प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# माधवराव पाटील महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा उत्साहात संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, पालम (परभणी) :** पालम येथील माधवराव पाटील महाविद्यालयात गुरुवार (दि.०६ ऑगस्ट) रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर शाखा पालम आणि माधवराव पाटील महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा उत्साहात पार पडला.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजनेंतर्गत आयोजित या मेळाव्यात परभणी जिल्ह्यातील विविध आस्थापनांनी सहभाग घेत उमेदवारांची निवड प्रक्रिया राबविली. मेळाव्याच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वरचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाई तुषार गोळेगावकर हे होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आत्माराम अरसुळे, डॉ.एच. टी.सातपुते, समाधान किरवले, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे अधिकारी, स्वामी समर्थ केंद्र पालमचे गडम, सहायक आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता परभणी प्र.सो.खंदारे, कृष्णताई इंगळे, तसेच चेटले मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. रोजगार मेळाव्यात ६९ महिला व ११३ पुरुष, असे एकूण १८२ उमेदवारांनी सहभाग नोंदवला. विविध शैक्षणिक संस्था व आस्थापनांनी पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन निवड प्रक्रिया पूर्ण केली.

या मेळाव्यात माधवराव पाटील महाविद्यालय, पालम, एलआयसी परभणी, ममता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पालम, ममता माध्यमिक विद्यालय, गंगाखेड, वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, परभणी, माताश्री जिजाऊ ग्राम विकास मंडळ, परभणी, जिंतूर एज्युकेशन सोसायटी संचलित बालक मंदिर विद्यालय, जिंतूर, श्री केशवराज शिक्षण प्रसारक मंडळ, सेलू, भारत भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, परभणी तसेच छत्रपती संभाजी विद्यालय, सुहागन आदी संस्थांनी उमेदवारांची निवड केली. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याला युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.